## ५) कृतियोजना :

### अ) आरोग्य उपकेंद्रांचे बळकटीकरण:

- प्रत्येक उपकेंद्रास दरवर्षी रूपये १०,०००/- या स्वतंत्र निधीची रक्कम परिचारिका व सरपंच यांच्या संयुक्त खात्यात जमा राहील. याचा विनियोग ग्रामपंचायतीच्या आरोग्य समितीच्या नियंत्रणाखाली राहील.
- उपकेंद्रासाठी पुरेसा औषधपुरवठा
- उपकेंद्राला पायाभूत सूविधा पुरविणे (इमारत इत्यादी)

### ब) प्राथमिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरण :

प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर गुणवत्तापूर्ण प्रतिबंधात्मक व उपचारात्मक सेवा पुरविणे व त्याचे दर्जेदार पर्यवेक्षण करणे हे या अभियानाचे एक खास वैशिष्ट आहे. आरोग्य सेवा समाजाच्या घरोघरी पुरविणे हाही एक आवश्यक घटक आहे. याशिवाय यामध्ये खालील घटकांचाही समावेश आहे.

- प्राथमिक आरोग्य केंद्रास दर्जेदार औषधे व साधनसामुग्रीचा अखंडीत व नियमित पुरवठा

करणे.

- कमीत कमी ५० टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रात २४ तास सर्व वैद्यकिय सेवा उपलब्ध करून देणे.
- जादाचे आर्थिक अनुदान व सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात २४ तास वैद्यकिय व बाळंतपणाच्या सेवा उपलब्ध करून देणे. गरज असेल तेथे एक स्त्री व एक पुरूष वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देणे.

## क) ग्रामीण रूग्णालयांचे बळकटीकरण :

ग्रामीण रुग्णालयांचे बळकटीकरण करून तेथे उत्तम अशी संदर्भसेवा केंद्रे विकसित करणे.

- सध्या कार्यान्वित असलेल्या सर्व ग्रामीण रूग्णालयात २४ तास संदर्भसेवा उपलब्ध करणे.
- नवीन मानकाप्रमाणे या ग्रामीण रूग्णालयात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.
- प्रत्येक ग्रामीण रूग्णालयाशी संलग्न अशा "रोगी कल्याण समित्या" विकसीत व कार्यान्वित करणे.

- ग्राहकांच्या हक्कांचे पत्रक तयार करून ते रूग्णालयात ठळक ठिकाणी प्रदर्शित करणे.
- आवश्यक तेथे नवीन ग्रामीण रूग्णालयांची स्थापना करणे.

## ड) जिल्हास्तरीय कृति योजना

- समाजाच्या गरजेनुसार कृतियोजना तयार करणे. गाव हा घटक ठरवून कृतियोजना तयार करणे.
- या कृतियोजनेत आरोग्याशिवाय सुरक्षित पाणीपुरवठा, योग्य पोषण व परिसर स्वच्छता या बाबींचा समावेश करणे.
- नियोजन, आर्थिक तरतूदी व अंमलबजावणी या बाबतीत जिल्हा हा केंद्रबिंदू राहील.
- केंद्रपुरस्कृत योजनांमध्ये जिल्ह्याच्या गरजेप्रमाणे बदल करणे.
- कुटुंब कल्याण व इतर आरोग्य कार्यक्रमाचे जिल्हास्तरावर एकत्रीकरण करणे.
- जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर ''अभियान नियोजन व अंमलबजावणी कक्ष'' निर्माण करणे.

## इ) परिसर स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छता:

परिसर स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छता या बाबींना आरोग्य सेवा अंमलबजावणीत महत्त्वाचे स्थान देणे. नियोजनात त्याचा योग्य असा अंतर्भाव करणे. संपूर्ण स्वच्छता अभियान १०० टक्के जिल्ह्यात राबविणे. याबाबत समाजाला आरोग्य शिक्षण देणे याचाही अंतर्भाव आहे.

## ई) रोगनियंत्रण कार्यक्रमाचे बळकटीकरण :

- हिवताप, क्षयरोग, अंधत्व, गलगंड या रोगांच्या नियंत्रणाचा या अभियानात समावेश केलेला आहे.
- संसर्गजन्य नसलेल्या रोगनियंत्रणाबाबत नवीन मोहिम राबविल्या जातील.
- गावपातळीवर रोग सर्वेक्षण कार्यक्रमाचे बळकटीकरण करणे.
- फिरती आरोग्य पथके कार्यान्वित करणे.

## फ) खाजगी वैद्यकीय क्षेत्राचा सहभाग :

विविध आरोग्य कार्यक्रमामध्ये खाजगी वैद्यकीय क्षेत्राचा सहभाग वाढविणे.

- सध्या ७५ टक्के रोगी उपचारासाठी खाजगी डॉक्टरांकडे जातात. या खाजगी डॉक्टरांवर शासनाचे योग्य नियंत्रण आणणे.
- जिल्हा कृतियोजनेत खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांना सहभागी करून घेणे. अशा सहभागासाठी मार्गदर्शक सूचना तयार करणे.

## ग) आर्थिक विनियोगाबाबत नवीन कार्यपद्धती :

- अभियानाला गति देण्यासाठी आर्थिक विनियोगाबाबत नवीन पद्धत
- जिल्हा समितीला पुरेसे आर्थिक अधिकार
- आरोग्य विषयक विमा योजनेसाठी पुरेसे आर्थिक पाठबळ

## ख) ग्रामीण आरोग्य समस्या पायाभूत मानून त्यादृष्टीने वैद्यकीय शिक्षण पद्धतीत योग्य ते बदल करणे.